In -6.261 • Special Issue - 155 • Mar. 2019 • ISSN - 2348-7143

ATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal
Multidisciplinary International E-research Journal

# CONTEMPORARY ISSUES IN INDIA (SOCIAL SCIENCE)

... Organized by ...

*Sillod Shikshan Sanstha Aurangabad's*

**Siddharth Arts, Commerce & Science College,**

**Jafrabad, Dist. Jalna - 431206 (M.S.) India.**

... Guest Editor ...

**Principal Dr. Ashok A. Kakade**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editors ...

**Prof. Sanjay T. Salve**

... Co-Editors ...

**Dr. S. L. Medhe | Dr. V. N. Patil**

**Dr. K. S. Patil | Prof. U. M. Wazarkar**

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

६३. ई–स्त्रोत : एन. लिस्ट कन्सोर्टिया ........ १६८
– प्रा. पठाडे ए.एल.
६४. उच्च शिक्षण आणि उपयोजित योग अभ्यास ........ १६
– डॉ. प्राजक्ती नि. वाघ
६५. भारतीय लोकप्रशासनासमोरील आव्हाने ........ १६
– सुभाष पोले
६६. अनुसूचित जातींच्या समस्या आणि वंचितीकरण ........ १६
– डॉ. राजेंद्र बगाटे
६७. भारतातील गरिबी – एक चिंतन ........ १७
– प्रा. शरद अंबादास पवार
६८. नक्षलवाद– एक विदर्भासमोरील आव्हान ........ १७
– राजेंद्र जाणू हिवाळे, भागवत अंकुश करडकर
६९. जन सामान्याच्या इतिहास लेखणातील नव्या संभावना ........ १७
– डॉ. शैलेश राऊत
७०. शेतकऱ्यांचा प्रश्न व सरकारची भुमिका ........ १६
– सहयोगी प्रा. सौ. प्रतिभा टावरी
७१. भारतातील राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्षांमधील सत्तासंघर्ष ........ १८
– प्रा. शरद बाबुराव सोनवणे
७२. भारतातील दारिद्र्य : एक ज्वलंत समस्या ........ १८
– डॉ. दिनेश यादवराव पारखे
७३. केंद्र–राज्य संबंध ........ १
– प्रशांत मलकाप्पा माठे
७४. आधुनिक ग्रंथालयामध्ये ई–बुक्सची आवश्यकता ........ १
– अमोल साहेबराव वाघमारे
७५. मुलभूत हक्क आणि भारतीय संविधान ........ १
– डॉ. संभाजी संतोष पाटील
७६. भारतातील बेरोजगारी एक समाजिक समस्या ........ १
– संतोष निकाळजे मुरलीधर
७७. स्वयंसहाय्यता गट : महिला सबलीकरणाचे एक प्रभावी माध्यम ........ १
– डॉ. प्रकाश तुकाराम शिंदे
७८. शेतकरी आत्महत्या एक सामाजीक चिंतन ........ १
– का. प्राचार्य डॉ. भिमराव प्र. उबाळे
७९. ई–अध्ययनाचे शिक्षणात महत्व, भूमिका व कार्य ........
– कु. जयश्री प्रल्हाद शिंदे
८०. पंचायत राज संस्था पुढील आव्हाणे ! ........
– डॉ. एकनाथ सोपानराव सुर्वे
८१. महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्था व तक्रार निवारण ........
– प्रा.डॉ. बालासाहेब किलचे,
८२. दहशतवाद : एक ज्वलंत समस्या ........
– प्रा. लक्ष्मण एफ. शिरोळे
८३. विकासात जलस्त्रोतांच्या व्यवस्थापनाची भूमिका ........
– डॉ. बिरंगणे एस. एस
८४. भारतातील स्त्री–पुरुष गुणोत्तर – एक अभ्यास ........
– डॉ.महादेवी वैजनाथ फड, कावळे एस.टी.

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal ISSN : 2348-71..
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 155 :* Contemporary Issues In India (Social Science) March 201..

# शेतकरी आत्महत्या एक सामाजीक चिंतन

का.प्राचार्य डॉ.भिमराव प्र.उ...
समाजशास्त्र विभाग,
संत भगवान बाबा कला महाविद्यालय, सिंदखेड राजा, जि.बुलडाणा

भारत हा शेती प्रधान देश आहे. भारतातील जवळपास ७० ते ७५% लोक ग्रामीण भागात राहतात. या सर्व लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती आहे. ज्यांच्या मालकीची शेती आहे असे लोक शेतकरी. ज्यांच्या जवळ स्वतःच्या मालकीची शेती नाही असे लोक शेतमजुर म्हणून शेतीवरच राबत असतात. शेतीवर अवलंबून आहेत. अगदी प्राचिन काळापासून भारतीयांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. बलुतेदारी असलेल्या समाजात लोकांच्या गरजा मर्यादीत होत्या. लोकसंख्या खुप कमी होती व खेडे स्वयंपूर्ण होते. त्यामुळे भारत सुजलम सुफलाम असल्याचे ईतिहासात आपल्याला दाखले सापडतात.

श्रेष्ठ शेती, मध्यम नोकरी व कनिष्ठ व्यवसाय किंवा धंदा अशी म्हण प्राचिन समाजात रुढ असल्याचे आपणास दिसून येते. ‘‘जय जवान जय किसन’’ हा नारा देखिल सर्वांनाच माहित आहे. एकंदरीत प्राचिन काळाचा जर विचार केला तर शेतकज्याकडे जगाचा व समाजाचा पोशिंदा म्हणून बधितल्या जात होते. गावगाड्यात शेतकज्याला एक वेगळा मानसन्मान मिळत होता. शेती व्यवसाय श्रेष्ठ दर्जाचा मानला जात होता. सिमेवर देशाचे संरक्षण करणारा सैनिक देशासाठी जितका महत्त्वाचा आहे. तितकाच नव्हे तर त्याच्यापेक्षा ही सरस कामगीरी या शेतकज्याची आहे. हा चिंतनाचा विषय आहे.

शेती हा भारतीय समाज व्यवस्थेचा, अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेतीवरच देशातील बहुसंख्य उद्योग व्यवसाय अवलंबून आहेत. शेती मधून अनेक उद्योगांना कच्चा माल पुरविला जातो. शेतीसाठी लागणाज्या गोष्टीसाठी देखिल अनेक उद्योग चालविले जातात. उदा. खते, बि-बियाणे, अवजारे तयार करणारे कारखाणे, शेती आणि शेतकरी हा घटक आपण देशातून वजा केला तर देशाच्या आणि तुमच्या आमच्या अस्तित्वाला काहीच किंमत उरत नाही. कारण माणुस अन्न खातो आणि ते अन्न फक्त शेतकरीच निर्माण करतो. अन्न खाणित सापडत नाही. कारखान्यात निर्माण करता येत नाही. देशाच्या संसदेत तयार होत नाही. ते तयार करतो फक्त शेतकरीच.

देशाच्या अर्थव्यवस्थेत आणि समाजव्यवस्थेत इतका महत्त्वाचा घटक असणारा शेतकरी आज उपेक्षितांचे जिवन जगत आहे. अत्यंत दारिद्रय, गरिबी, पराकोटीचे हालाखीचे, कंगाल जिवन आज शेतकज्याचे झाले आहे. अनेक समस्यांना तोंड देता देता त्याची शारीरीक शक्ती तर संपतच आहे. त्याच बरोबर बौध्दीक शक्तीसुध्दा संपत चालली आहे. समाज व्यवस्थेवरचा त्याचा विश्वास उडत आहे. तो एकलकोंडा बनत आहे. त्याला भेडसावणाज्या समस्यातून आपली सुटकाच नाही असा जेव्हा त्याचा ठाम विश्वास होतो. तेव्हा जगाचा पोशिंदा आत्महत्या करुन आपला आत्मनाश करतो. आत्महत्या करतो. अनेक वर्षापासून हा शेतकरी आत्महत्तेचा प्रश्न भारतीयांना भेडसावत आहे. दिवसेंदिवस शेतकरी आत्महत्तेचा प्रश्न जटील बनत चालला आहे. एक समस्या म्हणून देशाच्या समस्येतून या प्रश्नाची भर पडली आहे. देशा समोरचा तो ज्वलंत प्रश्न बनला आहे. शेतकरी आत्महत्तेचे हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

तज्ञ अभ्यासक, विचारवंत, समाजसेवक, राजकीय नेते आणि शासकीय अधिकारी या सर्वांनाच या प्रश्नाची दाहकता आता समजून घेण्याची वेळ आलेली आहे. आपल्या निढळाच्या घामाने जगाच्या भूकेचा प्रश्न सोडविणारा हा हाडाचा शेतकरी अशा कोण कोणत्या समस्येने वेढला आहे? कोणत्या समस्या त्याला जिवन नकोसे करण्यास प्रवृत्त करत आहेत? कोणत्या समस्यामुळे हा सुखी संसार त्याला नकोसा होवून आत्महत्तेचा मार्ग स्विकारण्याची वेळ त्याच्यावर येत आहे? ती कारणे शोधून त्यावर सकारात्मक चर्चा घडवून आणून व त्यासाठी कठोर उपाययोजना केल्याशिवाय शेतकरी आत्महत्या कमी होणे शक्य वाटत नाही. शेतकज्यांच्या आत्महत्तेसाठी कारणीभूत असलेली कारणे आपणास खालील प्रमाणे सांगता येतील.

१. **निसर्गावर अवलंबून असलेली शेती :** भरतीय शेती जवळपास निसर्गावर अवलंबून आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीमधून हमी उत्पन्न मिळू शकत नाही. पावसाचे प्रमाण कधी कमी तर कधी अधिक जास्त असते. त्यामुळे उत्पन्न घटते.

२. **वारंवार पडणारे दुष्काळ :** वातावरणात आता मोठे बदल होतांना दिसून येत आहेत. अनेकदा पावसाळा सुरू होवून ही पाउस पडत नाही. पावसात बराच मोठा खंड पडतो. त्यामुळे कधी कोरडा दुष्काळ पडतो तर कधी कधी अति पावसाने पूर्ण पिके वाहून जातात. पिके जळून जातात, पिवळे पडतात. त्यामुळे उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट होते.

३. **शेतीसाठी अपुज्या पाणिपुरवठ्याच्या सुविधा :** भरतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. शेतीचे उत्पन्न काढण्यासाठी मोठी धरणे, तलाव बंधारे, कालव्यांच्या माध्यामातून शेतीसाठी बारामहिणे पाणी पुरवठा करण्यासाठी लागणज्या गोष्टींची खुप कमतरता आहे. विहिरींचे प्रमाण खुप कमी आहे. त्यामुळे उत्पन्नाचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

४. **जमिनीचे तुकडीकरण :** भारतामध्ये दरडोई शेतीचे प्रमाण खुप कमी आहे. भावहिस्या प्रमाणे प्रत्येक वेळा जमिनीची वाटणी होते. प्रत्येकाच्या हिस्स्याला थोडी जमिन येते. म्हणजेच जमिनिचे तुकडीकरण खुप मोठ्या प्रमाणवर झालेले आहे. अशा तुकड्या तुकड्यामधून

उत्पन्न कमी होते. पर्यायाने शेतकऱ्याची परिस्थिती खालावते.

५. **परंपरागत पध्दतीने केली जाणारी शेती :** भारतीय शेती हि परंपरागत पध्दतीने केली जाते. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यापुरतेच उत्पन्न करण्यापुरतेच उत्पन्न घेण्यावर शेतकऱ्याचा भर असतो. बी-बियाणे, खते किटकनाशके अगदी जुनीच किंवा परंपरेनुसारच वापरली जातात. त्यामुळे देखिल शेती उत्पन्नाचे प्रमाण घटलेले दिसून येते.

६. **शेतकऱ्यांचे अज्ञान :** शेतीमधून कोणते उत्पन्न घ्यावे, कोणत्या उत्पन्नास मागणी आहे. उत्पन्न विक्रीची पध्दत, संक्रीत बि-बियाणांची माहिती. शसकीय योजनाविषयी अनेक शेतकरी अज्ञानी आहेत. या अज्ञानामुळे केलेल्या शेतीमुळे देखिल उत्पन्नात खुप मोठ्या प्रमाणावर घट झालेली दिसून येते.

७. **आधुनिक शेती पध्दतीकडे दुर्लक्ष :** आज आपण ज्याला यांत्रिक किंवा आधुनिक शेती ज्याला म्हणतो त्या पध्दतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आधुनिक बि बियाणे, खते, किटक नाशके, ट्रॅक्टर, मळणीयंत्र, फवारणी यंत्र, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, नगदी पिके घेण्याकडे शेतकऱ्याचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे देखिल शेती उत्पन्नात घट होत आहे.

८. **अति रासायनिक खतांचा वापर :** भारतातील बहुसंख्य शेतकरी गरीबच आहेत. परंतु अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून का होईना परंतु खतांचा मोठ्या प्रमाणत वापर केल्यामुळे जमिनीचा पोत खराब झाला आहे. जमिनीची उत्पादकता घटली आहे. खते आणि किटक नाशकाच्या अति वापरामुळे देखिल उत्पन्न घटले आहे.

९. **बी बियाणांच्या वाढत्या किंमती :** आज प्रत्येक वस्तुंच्या किंमती सारख्या वाढत आहेत. खते, बि बियाणे, किटक नाशके व शेती उपयोगी साहित्याच्या किंमती गगणाला भिडल्या आहेत. त्यामुळे उत्पन्न व खर्च यांचा मेळ बसत नाही. त्यामुळे देखिल शेतकऱ्याची परिस्थिती अत्यंत बिकट बनत चालली आहे.

१०. **शेती मालाला हमी भावाचा अभाव :** शेती मालाला शासनाचा हमी भाव नाही. त्यामुळे शेतकऱ्याचा माल अगदी कमी किंमतीला विकावा लागतो. शेतीवर केलेला खर्च व मेहनत यांचा विचार केला तर लावलेला पैसाही वसूल होत नाही. पर्यायाने शेतकरी व शेती व्यवसायावर अनेक संकटे ओढवली जात आहेत.

११. **दलालांचा सुळसुळाट :** महांगडी बि बियाणे, खते किटक नाशके, कोपलेला निसर्ग यांच्यामुळे शेती उत्पन्नात घट झालेलीच आहे. जे उत्प... हमीभाव नसल्यामुळे दलाल, व्यापारी ... मोठ्या प्रमाणावर शोषण करतात. त्यामुळे ... आर्थिक परिस्थिती बिकट बनत चालली ...

१२. **दळणवळणाच्या साधनांचा अभाव :** दळ... साधनांचा अभावामुळे उत्पन्न केलेला मा... बाजारपेठेत नेणे परवडत नाही. अनेक ठि... रस्त्यांचा अभाव आहे. येथे सुव्यवस्थीत ... त्यामुळे रेल्वे सेवा, हवाई वाहतूक या ... भारतीय शेतकरी कोसो दुर आहे. दळ... साधनांच्या अभावामुळे शेतकऱ्यांचे ... शेतमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान ...

१३. **सहकार बँकांची वासाहत :** शेतकऱ्यांना ... करणाऱ्या सर्व सहकारी बँक बुडीत नि... शासनाने थकीत कर्ज आणि अंतर्गत ... बँक बंद केल्या आहेत. इतर बँकांचा ... असल्यामुळे शेतकऱ्यांना बँका ... नाही. एकंदरीत शेतकऱ्यांनी ... कर्जपुरवठा करणाऱ्या बँक नसल्यामुळे आर्थिक समस्यांचा सामना करावा लागत ...

१४. **खासगी सावकारांचे वाढते प्रमाण :** शेत... वेळेवर कर्जपुरवठा करु शकत नाही. ... प्रक्रिया अत्यंत क्लिस्ट व जाचक असते. वारंवार बँकेत जावूनही कर्ज मिळत न... त्यांना हंगामी गावठी सावकाराचे कर्ज क... गावठी सावकाराचे व्याजदर खुप ... त्यामुळे कर्जाच्या दृष्टचक्रातच शेतकऱ्य... पिढ्या बरबाद होत आहेत.

१५. **शेतकऱ्यांचा दैववादी दृष्टीकोन** भार... हा अज्ञानी आणि दैववादी आहे नशि... ठेवणारा आहे. नशिब, दैव, देव, दे... यावर शेतकऱ्यांचा खुप विश्वास आहे. ... दृष्टीकोनामुळे शेतीमधून मिळणाऱ्या उ... बाबीवर होणारा खर्च मोठा असल्यामुळे अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे.

१६. **धार्मिक व सामाजिक प्रसंगावर अति...** भारतीय शेतकरी देव, धर्म, सण, समारं... जन्म, विवाह, मृत्यु यासारख्या प्रसंगाम... किंवा नसो, कर्ज काढून, घरातील वस्तु ... जमिनीचा तुकडा विकून स्वप्रतिष्ठेसाठी ... करतांना दिसून येतो. त्यामुळे देखिल शे... संकटात सापडत आहे.

१७. **नगदी पिकांचा अभाव :** परंपरागत ... जाणारी शेती, शेतीविषयी अज्ञान, प... अभाव यामुळे शेतकरी कमी भाव अस...

लागवड करतांना दिसून येतो. उस, कापुस, फळबाग लागवड, तंबाखु, मसाल्याचे पदार्थ असे पिके आपला शेतकरी अजूनही घेत नाही. त्यामुळे देखिल शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यात अडचणी येत आहे.

१८. **शेतीकडे उद्योग किंवा व्यवसाय म्हणून बघण्याचा अभाव :** आजही भारतातील बहुसंख्य शेतकरी एक उपजिविकेचे साधन म्हणून शेतीकडे बघतात. पाश्चात्य राष्ट्राप्रमाणे शेतीकडे एक उद्योग म्हणून बघीतल्यास शेतीत नविन नविन प्रयोग करुन अधिक उत्पन्न देणाऱ्या बि-बियाणे, अवजारे यांचा वापर करुन जास्तीत जास्त उत्पन्न काढण्याचा त्यांचा दृष्टीकोन बनत नाही. त्यासाठी अनेक कारणे सुध्दा कारणीभूत आहेत. त्यामुळे देखिल उत्पन्न कमी होते.

१९. **अपुरा विज पुरवठा :** भारतीय शेती हंगामी आहे. ज्या शेतकऱ्या जवळ शेतीला पाणी पुरवठा हंगामी करणे शक्य आहे. त्यांना विजपुरवठा च्या अपुऱ्या सुविधामुळे विहिरीत, धरणात पाणी असतांना सुध्दा पिकास पाणी देता येत नाही. लोडशेडींग, विजेचा गॅप, विज डिम असणे, विजेचा सततचा लपंडाव यामुळे शेतकरी अगदी त्रस्त झालेला आहे. पर्यायाने शेती उत्पन्नात घट होत आहे.

२०. **शेती प्रशिक्षणाचा अभाव :** इतर व्यवसायाचे ज्या प्रमाणे प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रशिक्षण शेतकऱ्यांना देखिल देणे आवश्यक आहे. नवनविन तंत्रज्ञानाचे, पिक पध्दतीचे, आधुनिक यंत्र सामुग्रीचे या सारख्या अनेक बाबींचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना देणे गरजेचे आहे. परंतु सध्यपरिस्थितीत शेती प्रशिक्षणाविषयी उदासिनता असलेली दिसून येते.

२१. **समाजव्यवस्थेतील शेती व्यवसायाचे स्थान :** आज शेतीकडे एक कनिष्ठ दर्जाचा व्यवसाय म्हणून बघीतले जाते. शेतकरी म्हणजे निर्धन, गरीब, दुबळा, अज्ञानी, कर्जबाजारी असा समज झालेला आहे. तो बरोबर ही आहे. मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य असलेला व्यवसाय म्हणजे शेती. त्यामुळे कुठे शिपाई म्हणून नोकरी चालेल पण दहा एकर शेती नको असा गैरसमज आज समाजात रुढ होतांना दिसतो आहे. त्यामुळे शेती व्यवसायाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. बाहेर रोजगार ही मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक, मानसिक व सामाजिक स्थिती बिघडत आहे.

२२. **शासकीय अधिकाऱ्याचे उदासिन धोरण :** शेती विषयी जी माहिती व योजना आहेत. त्या तळागळातिल शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात शासकीय अधिकाऱ्याची उदासिन वृत्ती कारणीभूत आहे. भारत सरकार शेती विकासासाठी अनेक प्रभावी योजना राबवित आहे. परंतु अधिकाऱ्याच्या उ
योजनांपासून व लाभाप
देखिल शेतकऱ्याची अ
दिसून येते.

२३. **शेती जोड धंद्याचा अ**
शेतीच करतो. शेती पु
करणाऱ्या शेतकऱ्यांचे
उत्पन्नावर त्यांच्या ग
जोडधंद्यामुळे शेतकरी
जोडधंद्याच्या अभावामु
आहे.

२४. **वाढता भ्रष्टाचार :** अ
जग भ्रष्टाचाराने वेढले
शेतकरीसुध्दा यात भ
व्यापारी, बँक अधिक
अनेक शासकीय अधि
देखिल शेतकऱ्याची स्थि
होत आहे.

२५. **व्यसनाचे वाढते प्रमाण :**
देखिल वाढत आहे.
हॉटेलिंग या सारख्या व्य
आहेत. आधुनिक व्यस
देखिल अनेक शेतक
शेतीकडे दुर्लक्ष होवून

२६. **महागडे शिक्षण आणि**
खर्चिक शिक्षणामुळे
स्थिती बिघडत आहे.
आरोग्याच्या समस्येने
मुलामुलींचा शिक्षणाचा
वैद्यकिय खर्चामुळे शेत
मार्गावर आहे. त्याचे वि

यासारखी अनेक कारणे
कारणीभूत आहे. वरील सर्वच कारणे
असतील असे नाही. परंतु यापैकी व
प्रत्येक शेतकरी बाधक आहे. हि सर्व
त्यामुळे हि कारणे दुर करणे मानवाल
समाजसुधारक, नेते. विचारवंत, प्रशासक
प्रयत्न केल्यास शेतकऱ्याच्या जिवनात
शेतकऱ्यांना नव संजिवनी देणे सहज
सर्वांनी तन-मन-धनाने सर्वांगीन पातळ
प्रत्येकाने निस्वार्थी भावनाने, मानवता
गरजेचे आहे. सर्वांगीण प्रयत्नाबरोबरच
शेतकरी आत्महत्तेचे प्रमाण कमी होण्या
मदत होईल.

शेतकरी आत्महत्त्या रोखण्यासाठी उपाययोजना :

१. **शेतीचे निसर्गावरील अवलंबित्व कमी करणे :** भारतातील बहुतांश शेती हि निसर्गावर अवलंबून आहे. वातावरणाच्या लहरीपणामुळे शेती उत्पन्नात सतत घट होत आहे. त्यामुळे निसर्गावरील शेतीचे अवलंबित्व कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. शेतीसाठी बारामाही पाणी पुरवठा करण्यासाठी मोठी धरणे, तलाव, विहिरी यांची वाढ करुन शेतीसाठी हमी पाणीपुरवठा केल्यास शेती उत्पन्नात हमखास वाढ होईल. यामुळे शेतकरी आत्महत्या कमी होण्यास मदत होईल.

२. **जमिनीचे तुकडीकरण थांबविणे :** जमिनिचे लहान-लहान तुकडे झाल्यामुळे त्याची योग्य मशागत करता येत नाही. त्यामुळे उत्पन्नात घट होते. या सर्व तुकड्यांचे एकत्रीकरण करुन सामुहिक शेती या प्रकाराखाली शेतकऱ्यांनी एकत्र आल्यास विस्तीर्ण शेती तयार होईल. अश शेतीमधून एक जात पिक पध्दतीची लागवड केल्यास मेहनत, खर्च कमी होवून उत्पन्नात वाढ होईल. पर्यायाने शेतकरी समृध्द बनून आत्महत्त्यांचे प्रमाण कमी होईल.

३. **शेती विषयीचे अज्ञान दुर करणे :** शेतकऱ्यांच्या मनामध्ये परंपरागत शेती पध्दती विषयी जे आकर्षण आहे. ते दुर करुन नविन व आधुनिक बि-बियाणे, खते , किटक नाशके, आधुनिक अवजारे या विषयीचे अज्ञान दुर करुन या नविन गोष्टीचे शेतकऱ्यांना ज्ञान आणि प्रशिक्षण दिल्यास निश्चित त्यांच्या प्रवृत्तीत बदल होवू शकतो. नविन आधुनिक पध्दतीने शेती केल्यामुळे शेतकरी संपन्न होवू शकतो.

४. **नदिजोड प्रकल्प योजना राबविणे :** ज्या परीसरात किंवा विभागामध्ये पाणी पातळी कमी व खोल आहे. धरणे व विहिरींचे प्रमाण कमी आहे. अशा प्रदेशात ज्या नद्यांना बारामाही व मुबलक पाणी आहे अशा नद्यांची जोडणी करुन त्याचे पाणी आणने आवश्यक आहे. अशा नदीजोड प्रकल्पामुळे जमिनीतील पाण्याची पातळी वाढून शेतीसाठी पाणीपुरवठा करणे सहज शक्य होईल. आणि शेती उत्पन्नात वाढ होईल.

५. **परंपरागत शेती पध्दतीचा त्याग :** शेतीमधून जास्तीत जास्त उत्पन्न घेण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने परंपरागत पध्दतीने शेती न करता आधुनिक पध्दतीने शेती करणे गरजेचे आहे. आधुनिक बि-बियाणे, खते, किटक नाशके , अवजारे यांचा वापर केल्यास निश्चितच शेती उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

६. **अधिक उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा शोध :** भारतीय शेती ही तुकडी करणाने बाधित आहे. तरी पण अशा लहान लहान तुकड्यामधून सुध्दा जास्त उत्पन्न देणाऱ्या बियाणांचा शोध लावणे, त्याचा प्रचार आ
प्रसार तळागळातील शेतकऱ्यांपर्यंत केल्यास निश्चि
शेती उत्पन्नात वाढ होयू शकते.

७. **रासायनिक खतांच्या वापरावर निर्बंध :** रासायनि
खतांच्या अति वापराने जमिनीचा पोत खराब झाल
आहे. तिची उत्पादकता कमी झाली आहे. त्यामु
रासायनिक खतांचा वापर कमी करणे. त्या ऐव
सेंद्रिय खतांचा वापर केल्यास खर्च कमी होऊ
उत्पन्नात वाढ होईल.

८. **दलाल मुक्त बाजारपेठ :** शेतीतून अत्यंत कष्टाने
खर्चिक पध्दतीने काढलेले उत्पन्न विकण्यासा
शेतकऱ्याची खुप हेळसांड होते. मार्केटमधील अडत
व्यापारी व दलाल शेतकऱ्याचे खुप शोषण करता
अत्यंत कमी किंमतीला मालाचा लिलाव होतो. त्य
शेतकऱ्यांना नाईलाजाने मोठ्या प्रमाणावर मानसि
व आर्थीक नुकसान होते. हे नुकसान टाळण्यासा
शासकीय खरेदी केंद्र सुरु करणे, तत्पर मालाची वि
करणे व शेतकऱ्यांना मालाचे नगदी पैसे मिळण्या
तरतुद करणे आवश्यक आहे.

९. **शेती मालाला हमी भाव :** शेतकऱ्यांच्या माला
हंगामामध्ये भावच मिळत नाही. हंगाम निघून गेल्यानं
शेतकऱ्याकडील माल संपल्यानंतर उत्पन्नास भ
येतो. यामध्ये व्यापाऱ्याचा फायदा होतो. शेतकऱ्यां
नुकसान होते. त्यामुळे प्रत्येक वर्षा अगोदर पुढी
वर्षाच्या शेतीमालाचे भाव सरकारने जाहीर करावे
वर्षभर त्या हमी भावाने मालाची खरेदी करावी. त्यामु
शेतकऱ्यांना फायदा देणारे पिके कोणती ते समज
लागवड करता येईल. हमी भावामुळे शेतकऱ्यां
आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.

१०. **शेती मालविक्रीसाठी दळणवळणाची सुविधा :** दु
भागात व खेड्यात अनेक भागात दळणवळणाच
सुविधांची उणीव आहे. त्यामुळे मालविक्रीसाठी अने
समस्या निर्माण होतात. त्यामुळे कमी किंमतीला धा
विकावे लागते. दळणवळणाच्या साधणांची सुवि
निर्माण झाल्यास शेती माल योग्य वेळी योग्य किंमती
विकणे शेतकऱ्यांना शक्य होईल.

११. **शेतीमालासाठी हरीतगृहांची निर्मिती :** शेतीम
निर्माण होणारे व लवकर नाश पावणारे, खराब होण
फुले, फळे, पालेभाज्या सारखे उत्पन्न दळणवळणाच
साधनाअभावी बाजारपेठेत पोहचण्या आधीच न
पावते. त्यामुळे अशा उत्पन्नासाठी गावागाव
हरीतगृहाची सुविधा असल्यास शेतकऱ्यांचे नुकस
होणार नाही. पर्यायाने शेतकऱ्यांचा फायदा होईल.
आर्थीक परिस्थिती बळकट बनण्यास मदत होईल.

१२. **कमी व्याजदरात कर्ज पुरवठ्याची सुविधा :** शेतक

आर्थिक अडचणीत असतात. शासकीय बँकांचे व गावठी सावकारांचे जास्त व्याजदर असणारे कर्ज शेतकऱ्यांना व्याजाच्या दुष्ट चक्रात गुंतवत असते. त्यामुळे कमी व्याजाने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी शसकीय पातळीवरुन उपाययोजना होणे आवश्यक आहे.

१३. **ग्रामीण भागात शासकीय पतसंस्थांची निर्मिती :** शेतकऱ्यांना हंगामी कर्जपुरवठा कमी व्याजदराने करण्यासाठी ग्रामीण भागात पतसंस्थांची निर्मिती होणे आवश्यक आहे. अशा पतसंस्था शेतकऱ्यांना कर्ज देतिल व उत्पन्नावर टप्याटप्याने त्याची वसुली करतील. उत्पन्नावर वसुली केल्यामुळे शेतकऱ्यांना जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागणार नाही.

१४. **गावठी सावकारावर बंधने :** शेतकऱ्यांच्या आत्महत्तेस गावठी सावकाराचे कर्ज मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहेत. या सावकारांचे व्याजदर खुप मोठे असते. अनेक शेतकरी वर्षानुवर्षे हे कर्ज फेडतच असतात. अनेक भूमिहिन झाले आहेत. त्यामुळे गावठी सावकारावर बंधने घालणे अत्यंत आवश्यक आहे.

१५. **दैववादी प्रवृत्तीला आळा घालणे :** शेतकऱ्यामध्ये देव व दैवादी प्रवृत्ती मोठ्या प्रमाणावर आहे. दैव, नशिब, भाग्य यासारख्या गोष्टीवर त्यांचा विश्वास आहे. प्रयत्नवादात व बुध्दीवादात अनेक शेतकरी कमी पडतांना दिसून येतात. ऐन शेतीच्या हंगामात हे दिंडी, देवदर्शन, धार्मिक कार्यक्रमात वेळ घालवितात. पर्यायाने शेतीकडे दुर्लक्ष होते. त्यासाठी अशा विचारांपासून दुर राहण्यासाठी त्यांचे प्रबोधन करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे.

१६. **अनुत्पादक खर्चास आळा :** लग्न, सन, समारंभ, धार्मिक विधी, उत्सव, यात्रा यासारख्या गोष्टीवर आज शेतकरी सुध्दा अगदी सढळ हाताने खर्च करीत असतो. आपली कुवत लक्षात न घेता, कर्ज काढून, शेती, गुरे, घर गहान ठेवून कर्ज घेऊन या समारंभात खर्च केला जातो. त्यामुळे हा अनुत्पादक व अवास्तव खर्चास सर्वांनीच बंधने घातली तर शेतकऱ्यांवर आत्महत तेची वेळ येणार नाही.

१७. **नगदी पिकांवर भर :** शेतकऱ्यांनी परंपरागत पिके न घेता. नगदी पैसे देणारे उस, तंबाकु, कापुस, मसाल्याचे पदार्थ, फुले, फळे यासारखी पिके घेणे गरजेचे आहे. कारण अशा पिकांना खुप मागणी आहे. भावही चांगला मिळतो. त्यामुळे नगदी पिकपध्दतीकडे शेतकऱ्यांनी वळणे गरजेचे आहे.

१८. **शेतीसाठी कायम विजपुरवठा :** औद्योगिक वसाहतीला जसा पूर्णवेळ विजपुरवठा कायम पुरविला जातो. अगदी तसाच पूर्णवेळ विजपुरवठा शेतीसाठी होणे आवश्यक आहे. विज पुरवठ्या अभावी अनेक शेतकऱ्यांची पिके हातची जातात. यामुळे आर्थिक नुकसान होते. शेतकरी अडचणीत येतो. म्हणून आत्महत्या रोखण्यासाठी कायम विजपुरवठा हाही उपयुक्त ठरु शकतो.

१९. **शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा व मेळावे :** शेती उत्पादन वाढ होण्यासाठी, शेतकऱ्यांना आधुनिक शेती पध्दतीचे ज्ञान होण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी अगदी तालुका व गावपातळीवर कार्यशाळा व मेळावे घेवून शेतकऱ्यांना शेती विषयी व इतर पुरक व्यवसायाविषयी मार्गदर्शन झाल्यास शेतकरी आत्महत्या कमी होण्यास मदत होईल.

२०. **शासकीय योजनांची माहिती :** शासकीय स्तरावर शेतकऱ्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या येतात. परंतु या योजनाविषयीची माहिती ग्रामीण भागातील व खेड्यांतील शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही. त्यामुळे या योजनापासून ते वंचित राहतात. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी या योजनांची माहिती सर्वांना मिळणे गरजेचे आहे.

२१. **जोडधंद्यास आर्थिक मदत :** शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शेतीपुरक व्यवसाय ज्यास आपण जोडधंदा म्हणतो. असा धंदा किंवा व्यवसाय करण्यास शेतकऱ्यास शासनाकडून मदत मिळाल्यास शेतकऱ्यास आर्थिक संपन्नता येईल. त्यांचे आत्महत्या रोखण्यास मदत होईल.

शेतकरी आत्महत्या हा सर्वांगीन चिंतनाचा विषय बनला आहे. प्रत्येक प्रदेशात व प्रत्येक शेतकऱ्यांच्या जीवनातील समस्या व अडचणी निश्चित भिन्न-भिन्न असतील. परंतु शेतकरी आत्महत्यांचा आकडा हा दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे या प्रश्नावर गांभिर्याने विचार होणे गरजेचे आहे. सुचविलेल्या उपायामधून कोणत्या ना कोणत्या उपायातून शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती उंचावण्यास मदत होईल. शेतकऱ्यांचा विकास होईल. या उपाययोजनांची अमलबजावणी केल्यास निश्चितच शेतकरी आत्महत्या रोखल्या जातील. शेतकऱ्यांनीसुध्दा हिंम्मत न हारता, जिद्दीने कठीण प्रसंगात उभे राहून वरील उपायांपैकी एका जरी उपायाचा अवलंब केल्यास निश्चितच त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.

म्हणून म्हणावेसे वाटते... .
शेतकरी सुखी तर देश सुखी ।
राबला शेतकरी तर घास मुखी ।।
शेतकरी संपला तर देश संपला ।
भुके कंगाल जीवनाला मुकला ।।... ...